पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, जुलै २०२०, खंड १९, अंक ४, पृष्ठे ३२

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● महात्मा

५ ● 'महात्मे'पण जागविणारा समाजपरिवर्तक

११ ● रोगांशी लढा, हल्ल्यांचा तिढा

१९ ● मोटरगाड्यांचा हवाईप्रवास!

२३ ● अर्थबोधपत्रिका पुरवणी


भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,
२५६५७६९७
ई-मेलः- ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १९ (अंक ४) जुलै २०२०**
**संपादक - अभय टिळक**
**सहयोगी संपादक - पराग पोतदार**

*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# महात्मा

एका मोठ्या योगायोगाचे दर्शन 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकाद्वारे घडेल अथवा घडावे. भाषा हा कोणत्याही लोकसमूहाच्या सुविहित आणि पृथक अशा सुसंघटित अस्तित्त्वाचा निरपवाद निदर्शक मानला जातो. त्या न्यायाने, 'महाराष्ट्र'नामक प्रदेशात वास करणा-या जनसमूहांची लोकभाषा असणा-या मराठीला ग्रंथभाषेची महत्ता आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देणा-या महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक व प्रणेते असणा-या महात्मा चक्रधरांचे ८००वे जयंतीवर्ष अवघ्या काहीच दिवसांनी आपल्या आयुष्यात प्रवेशणा-या ऑगस्ट महिन्यात सुरू होते आहे...आणि 'महाराष्ट्र' नावाचे स्वायत्त भू-राजकीय एकक अस्तित्त्वात येऊन दोनच महिन्यांपूर्वी ६० वर्षे उलटलेली आहेत. म्हणजे, ***महाराष्ट्रीं असावे*** असा उपदेश आपल्या शिष्यांना आवर्जून करणा-या चक्रधरस्वामींची आठवी जन्मशताब्दी आणि १ मे १९६० या दिवशी अस्तित्त्वात आलेल्या 'महाराष्ट्र' नावाच्या भू-राजकीय एककाची षष्ट्यब्दी एकाच कॅलेंडर वर्षात यावी, हा मधुर योगायोग ठरतो. ***महंतराष्ट्र म्हणौनि महाराष्ट्र : महंत म्हणिजे थोर :*** असे या भूप्रदेशाचे वर्णन करणा-या स्वामींना महाराष्ट्राचे कौतुक किती आणि कसे वाटत असे, याची साक्ष त्यांचे हे उद्‌गारच देतात. आजचा महाराष्ट्र आणि चक्रधरस्वामींच्या परिचयाचा महाराष्ट्र यांत सर्वार्थाने प्रचंड फरक पडलेला आहे आणि असावा, हे स्वाभाविकच ठरते. 'थोर'पणाच्या व्याख्येला असलेले आयामही दरम्यानच्या काळात बदलावेत, हेही नैसर्गिकच ठरते. तरीही, आजमितीला आर्थिक-औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्र हे आपल्या देशातील एक अग्रगण्य राज्य आहे, हे कोणीही नाकारणार नाही. त्यांमुळे, पालटलेल्या परिस्थितीत, शब्दांना वेगळी अर्थवत्ता लाभल्यानंतरही आपले 'थोर'पण टिकवून धरण्यात महाराष्ट्र आठ शतकांनंतरही ब-यापैकी यशस्वी ठरलेला आहे, यांबाबत फारसे दुमत होण्याचे कारण नाही. चक्रधरस्वामींची आठवी जन्मशताब्दी आणि महाराष्ट्राच्या निर्मितीची षष्ट्यब्दीपूर्ती या दोहोंच्या निमित्ताने याच दोन अध्ययनप्रांतांना स्पर्शणारे दोन लेख 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात जाणीवपूर्वक समाविष्ट केलेले आहेत.



ज्या महानुभाव पंथाची स्थापना चक्रधरस्वामींनी केली त्या महानुभाव पंथाची मूल्यप्रणाली आज आठ शतकांनंतरही तितकीच प्रस्तुत आणि टवटवीत आहे. स्वामींना अपेक्षित असलेले महाराष्ट्राचे थोरपण लाभावे-टिकावे या दृष्टीने त्या मूल्यप्रणालीचे उपयोजन आपण आज कसे करणार, हाच खरा प्रश्न आहे. कोणाला आवडो अगर न-आवडो, पटो अगर न-पटो, परंतु, समाजजीवनाचा कस आणि पोत हा त्या समाजातील राजकीय नेतृत्त्वाची गुणवत्ता व बांधिलकी या बाबींवर अखेर बव्हंशी निर्भर राहतो. साठोत्तरी महाराष्ट्राला आजचे रंगरूप प्रदान करणा-या इथल्या एकंदरच राजकीय व्यवस्थेचे, नेतृत्त्वाचे आणि त्या नेतृत्त्वाची जडणघडण करणा-या राजकीय संस्कृतीचे रंगरूप गेल्या सहा दशकांदरम्यान कसे बदलत आलेले आहे, याचा एक ढोबळ लेखाजोखा मांडणारा प्रा. डॉ. अभय दातार यांचा लेख पुरवणी विभागात अगत्यपूर्वक घेण्यामागील हेतू तोच. ■■

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत-स्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्‌धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

स्मरणरंजन

# ‘महात्मे’पण जागविणारा समाजपरिवर्तक

एकंदरच लोकव्यवहारावर धर्मसंस्थेचा असणारा सर्वकष पगडा हे मध्ययुगाचे वैश्विक वैशिष्ट्यच जणू. ‘पिंडी ते ब्रह्मांडी’ या न्यायाने महाराष्ट्रही त्याला अपवाद नव्हता. मध्ययुगीन मराठी लोकव्यवहाराच्या विविध अंगांवर धर्मसंस्थेचा, धर्मसत्तेचा आणि त्या सत्तेच्या चाव्या मुठीमध्ये असलेल्या धर्ममार्तंडांचा जबर वरचष्मा नांदत होता. जन्मजात अधिकारभेदाला अधिमान्यता देणा-या त्या व्यवस्थेने चारही वर्णांतील स्त्रिया आणि शूद्रातिशूद्रांच्या पदरी उपेक्षा आणि अनधिकाराचेच दान घातलेले होते. समाजव्यवस्थेत पत नाही, अधिकार नाहीत, त्यांमुळे स्वायत्तता नाही, शिक्षणाला वर्णाश्रमप्रधान व्यवस्थचे साखळदंड असल्याने ज्ञानार्जनाचे मार्ग बंद अशा चहूंकडून झालेल्या कोंडीमध्ये घुसमटणा-या संबंधित समाजसमूहांना उन्नयनाचा मार्ग खुला करण्याचे एक प्रारूप तत्कालीन महाराष्ट्रामध्ये साकारला. महानुभाव पंथ हे त्याचे नाव. आणि चक्रधरस्वामी हे त्या अ-साधारण प्रारूपाचे शिल्पकार. त्या काळातील समाजव्यवस्थेने ज्यांचे अस्तित्त्वच मुदलात बेदखल बनविलेले होते अशा समाजघटकांना आत्मभान प्रदान करण्याचा तो आद्य उपक्रम गणावा लागेल. चालू कॅलेंडर वर्षातील ऑगस्ट महिन्यात चक्रधरस्वामींच्या अवताराची अष्टशताब्दी सुरू होते आहे. परंपराग्रस्त आणि संकुचित अशा धर्मव्यवहाराने कुंठित बनलेला समाजजीवनाचा प्रवाह नवविचारांच्या प्रवर्तनाद्वारे पुन्हा एकवार वाहता करण्याचे जे ऐतिहासिक कार्य महानुभाव पंथाने आणि त्याचे प्रवर्तन करणा-या चक्रधरांनी १२-१३व्या शतकात या महाराष्ट्रामध्ये साकारले त्याची स्मृती, या टप्प्यावर, जागविणे हे केवळ उचितच नव्हे तर आवश्यकही ठरते. कारण, महानुभाव पंथ आणि पर्यायाने चक्रधरांना ज्यांचा सामना करावा लागलेला होता ती सामाजिक-सांस्कृतिक आव्हाने आज आठ शतकांनंतर पूर्णतः अप्रस्तुत ठरलेली आहेत, असे म्हणणे, समकालीन समाजवास्तव न्याहाळता धाडसाचेच ठरेल.



चक्रधरकालीन महाराष्ट्रावर सत्ता होती यादवांची. कृष्णदेव, महादेवराय, आमणदेव आणि रामदेवराव या चारही यादव सत्ताधीशांची कारकीर्द चक्रधरांनी अनुभवली. हे सगळेच यादव शासक होत वेदाभिमानी. साहजिकच, यादवशासित प्रदेशातील व्यवहारावर वैदिक जीवनदृष्टीची छाप होती. वर्णाश्रमप्रधान जीवनपद्धती हाच लोकव्यवहार असे. चातुर्वर्ण्याचा जबर प्रभाव आणि पगडा समाजजीवनावर असल्याने अनंत प्रकारच्या नीतीनियमांनी सर्वच समाजघटकांचे जगणे अनुशासित झालेले होते. कमालीची रूढीप्रियता, परंपराग्रस्तता आणि टोकाचे कर्मकांड हेच धर्मसंस्थेचे व्यवहारातील रूप-स्वरूप होते. समाजजीवन असे करकचून बांधल्यासारखेच जणू बनलेले असल्याने त्याल कुंठितावस्था यावी, हे ओघानेच आले. नवचिंतन, नवशोधन यांसारख्या प्रवृत्तींना मुळातच अवकाश सीमित होता.

चक्रधरकालीन महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन मात्र बहुरंगी होते. अनेक राजे जैनधर्मानुयायी असल्यामुळे जैन धर्माचे आसन अनेक भागांत स्थिर होते. साहजिकच, जैन धर्मतत्त्वांचा लोकमानसावर प्रभावही होता. महाराष्ट्राच्या काही भागांत, खास करून दक्षिण महाराष्ट्रामध्ये, वीरशैवांचा प्रभाव तुलनेने अधिक होता. उत्तरेकडून येणा-या नाथयोग्यांचा संचार तर सतत चालूच असे. विठ्ठलभक्तीप्रधान वारकरी संप्रदाय जवळपास सर्वदूर पसरलेला होता. परिणामी, शैव, वैष्णव आणि जैन या तीन परंपरांच्या तत्त्वविचारांचे सिंचन तत्कालीन समाजाच्या मनोभूमीवर घडत असे. शैवांमधील कापालिक तसेच नाथपंथीयांच्या मतांचाही परिचय समाजमानसाला होता. इथे पुन्हा एक गंमत दिसते. नाथपंथावर वज्रयानी बौद्धांचा मोठाच प्रभाव राहिला. त्यांमुळे, नाथपंथीयांच्या माध्यमातून बौद्ध तत्त्वविचारही इथल्या विचारविश्वात झिरपत राहिला. एकंदरीने बघता शैव, वैष्णव, जैन, कापालिक, नाथ, बौद्ध..अशा विविध तत्त्वपरंपरांचा संगम चक्रधरकालीन महाराष्ट्राच्या लोकजीवनामध्ये नांदताना आपल्याला दिसतो.

हे उत्साहवर्धक चित्र एकीकडे दिसत असतानाच समाजाच्या अनेक स्तरांत नानाविध अशा अनिष्ट, अवनत साधनाप्रकारांचा अवलंब आणि प्रसारही त्या वेळच्या महाराष्ट्रात दुसरीकडे घडतच होता. अप्रगल्भ भक्तिसंकल्पनांच्या जाळ्यात अनेकानेक समाजस्तर गुरफटलेले होते.

## आस जीवमात्रांच्या कल्याणाची

भेदप्रवण असणारी तत्कालीन समाजव्यवस्था आणि लोकव्यवहार यांत नवपंथप्रवर्तनाद्वारे परिवर्तन घडवून आणण्यासाठी सिद्ध होणे यांत चक्रधरांचे सारे अ-साधारणत्व सामावलेले आहे. लोकव्यवहारावर नियंत्रण नांदते राजसत्तेचे. आणि, ज्या काळात जन्मजात अधिकारभेद मानणा-या धर्मसंस्थेचा राजसत्तेवर वैचारिक प्रभाव होता अशा काळात मानवी जगण्यासंदर्भात काही एक नवीन दृष्टी प्रवर्तित करणे, ही बाब तर कठीणतम होती. हे काम सोपे नव्हते. साहजिकच, समाजपरिवर्तनाच्या चक्रधरप्रणीत प्रयत्नांमध्ये एक अंतर्गत सूत्र आणि काही एक क्रम दिसतो. सत्य, अहिंसा आणि करूणा या तीन मूलतत्त्वांच्या पायावरच कल्याणप्रद जीवनाची उभारणी शक्य आहे, ही जाणीव आणि भावना समकालीन समाजमानसावर बिंबविणे, हा, साहजिकच चक्रधरांच्या कार्याचा आरंभीचा टप्पा ठरला.

समाजाच्या अनेक स्तरांमध्ये नांदणारा अवनत आचारधर्म आणि अप्रगल्भ भक्तिसंकल्पना हा अज्ञानाचा परिपाक होय, हे चक्रधरांनी अचूक हेरले होते. त्यासाठी समाजमन हे व्यापक प्रमाणावर शिक्षणाच्या संस्कारांनी सिंचित होणे गरजेचे आहे, हे वास्तव त्यांच्या सघन अंतर्दृष्टीला जाणवले. परंतु, सारी गोम होती ती नेमकी तिथेच. ज्ञानसंपादनाच्या चाव्या तत्कालीन समाजव्यवस्थेतील तथाकथित धर्ममार्तंडांनी आणि उच्चवर्णियांनी त्यांच्या मुठीमध्ये बंदिस्त करून ठेवलेल्या होत्या. मग, ज्ञानसंपादनाचा अधिकार समाजातील स्त्री-शूद्रादिकांसह सर्व जातिवर्णांना आहे, असा ठाम पुकारा चक्रधरांनी करत स्त्री-शूद्रांना ज्ञानसंपादनाचे अधिकारी बनविले. महानुभाव पंथामध्ये महादाइसा, आबाइसा यांच्यासारख्या महिला चक्रधरांशी परमार्थविषयक चर्चा करताना दिसतात. तर, राणाइसा, लाखाइसा, जोमाइसा, आऊसा, लखुबाइसा, देमती, एल्हाइसा यांसारख्या अनेक स्त्रियांबरोबर चक्रधरस्वामी घराचे व्यवस्थापन, रोगराई यांसारख्या प्रापंचिक विषयांबरोबरच ईश्वर, मानवता यांसारख्या पारलौकिक प्रांतांबाबतही विचारविनिमय करताना दिसतात. ज्ञानार्जनाचा मिळालेला अधिकार आणि शिक्षणाद्वारे प्राप्त झालेला आत्मविश्वास यांच्या या खुणा होत.



समाजातील सर्व घटकांचे सक्षमीकरण शिक्षणाद्वारे घडवून आणायचे तर ज्ञानव्यवहार हा लोकभाषेमध्ये घडून येणे अत्यावश्यकच नव्हे तर अनिवार्य ठरते. चक्रधरकालीन ग्रंथव्यवहार आणि ज्ञानविश्व या दोन्ही ठिकाणी पक्की मांड होती ती संस्कृत भाषेची. संस्कृच्या आग्रहापायी ज्ञानव्यवहाराच्या संकुचित बनलेल्या वाटा मोडून ज्ञानार्जनाचे राजमार्ग खुले करण्यासाठी चक्रधरांनी आणि पर्यायाने महानुभाव पंथाने जाणीवपूर्वक डोळस स्वीकार केला तो म-हाठीसारख्या लोकभाषेचा. स्वामींच्या लीलांचे संकलन करणारा ‘लीळाचरित्र’ हा ग्रंथ मराठी भाषेतील आद्य अक्षरलेणे म्हणून चिरंतन बनण्यामागील विचारप्रक्रिया ही अशी आहे. बोली लोकव्यवहार सुकर बनविणारे माध्यम म्हणूनच केवळ नव्हे तर, प्रौढ ग्रंथसंपदा जिच्यामध्ये निर्माण करता येईल अशी म-हाठी ही सक्षम भाषा आहे, हा संदेश त्यांतून समाजमनावर बिंबला.

या सगळ्या पुनर्रचनेला अधिष्ठान लाभले ते चक्रधरांनी अत्यंत हिरिरीने अंगीकारलेल्या समताधिष्ठित तत्वज्ञानाला अनुसरणा-या व्यवहाराचे. उच्चनीचतेच्या भावनेला महानुभाव पंथाने पार तिलांजली देऊन टाकली. जातिभेदातीत अशा समतेवर बेतलेल्या व्यवहाराचा पुरस्कार केला. लोकमानसात खोलवर भिनलेल्या विटाळ-चांडाळाच्या कल्पनांना महानुभाव पंथाने थेट आणि पूर्ण मूठमाती देऊन टाकली. स्त्री-शूद्रादिकांना मुक्त प्रवेश बहाल करणा-या महानुभाव पंथविचाराने चातुर्वर्ण्याचा स्पष्ट धिःक्कार करत स्पृश्यास्पृश्यतेचा विचार आणि त्यांवर बेतलेला लोकव्यवहार सपशेल नाकारला. केवळ संन्यासाचाच नव्हे तर मोक्षाचाही अधिकार या पंथाने स्त्री-शूद्रादिकांना मुक्तहस्ते बहाल केला. समकालीन समाजव्यवहारांतील अनिष्ट आणि कालबाह्य रूढींवर चक्रधरस्वामींनी आपल्या आचरणाद्वारे कठोर आणि निर्भीड आघात केले. चक्रधरांनी प्रवर्तित केलेल्या त्या नवपंथविचाराचे आणखी एक प्रधान वैशिष्ट्य म्हणजे अंतःशुद्धीवर त्याचा असलेला भर. महानुभाव पंथाने ज्या आचारधर्माचा नवीन प्रवाह या भूमीमध्ये प्रवर्तित केला त्याचा मुख्य भर बाह्यशुचितेपेक्षा अंतःशुद्धीवर अधिक होता आणि राहिला. आत्यंतिक वैराग्यशील आचरणाचे संस्कार घडविणा-या महानुभाव विचाराने अहिंसा हेच ईश्वरप्राप्तीचे साधन मानले.

## स्वयंप्रामाण्य शिरोधार्य

नवप्रवर्तनाचे, व्यापक सामाजिक समतेचे आणि जातिभेदातीत समाजव्यवस्थेचे बीजारोपण करणा-या या चक्रधरप्रणीत धर्मदृष्टीमध्ये अग्रेसरत्व होते ते स्वयंस्फूर्तीला. पंथाने प्रधान भर दिला तो आत्मप्रचीतीवर. शब्दप्रामाण्यापेक्षाही महत्ता मानली ती स्वयंप्रामाण्याची. शब्दांपेक्षाही धर्मरहस्य अनुयायांच्या आचरणाद्वारे प्रगट व्हावे, यांबाबत स्वामींचा कटाक्ष प्रारंभापासून राहिला. मठातील शिस्त व आज्ञापालन यांबाबत ते निरपवाद कठोर होते. मात्र, परपंथ, परपंथीय देवता आणि परपंथीय आचार्य यांच्यासंबंधी द्वेष अगर मत्सर यांसारख्या हिणकस भावभावनांचा त्यांच्या अंतःकरणाला दूरान्वयेही संसर्ग कधीच झाला नाही. वैरीयाचा देवो जाला तरी काइ दगड घालोनि फोडावा...अशा सडेतोड शब्दांत स्वामींनी त्यांच्या दोन शिष्यांना एकदा चांगले खडसावल्याचे नमूद आहे.

नवपंथप्रवर्तकाला आवश्यक असणारे व्यक्तिमत्त्व चक्रधरस्वामींना सर्वार्थाने लाभले होते. त्यांचे बाह्यरू प तर कमालीचे चित्तवेधक आणि गोमटे होते यात शंकाच नाही. परंतु, त्यांचा स्वभाव आणि आचार कोणाही व्यक्तीला आकर्षून घेईल इतके प्रभावी व लोभस होते. म-हाठी, गुजराती आणि संस्कृत या तीनही भाषा चक्रधरांना उत्तम अवगत होत्या. पंथीय शिस्तीबाबत कठोरतम भासणा-या स्वामींचे अंतःकरण मात्र विलक्षण कोमल होते. ती कोमलताही पुन्हा सर्वसमावेशक अशीच. लहान मुलांशी ते चट्दिशी समरस होत. विरक्ती, निःस्पृहता आणि वक्तृत्व हे तीन गुण त्यांच्या सा-या चलनवलनाद्वारे सतत परावर्तित होत असत. भेट घेण्याची तीव्र तळमळ असलेल्या महादेवराय यादवाला शिष्यत्व देण्याचे स्वामींनी टाळले. प्रत्यक्ष सत्ताधीश राजा शिष्य बनला तर त्याच्या बडेजावापायी सर्वसामान्य शिष्यगणांची कुचंबणा होईल, असे जे कारण या संदर्भात चक्रधर देतात ते त्यांच्या ठायी वसणा-या निःस्पृहतेचे पुरेपूर द्योतक ठरते. अशी पराकोटीची विरक्ती आणि निःस्पृहता बाणलेली असल्यामुळेच कोणा एखाद्या गृहस्थाच्या घरी निवास केल्याची उदाहरणे स्वामींच्या जीवनात विरळच दिसतात. रहिवासासाठी मठ, मंदिरे जवळ करण्याकडेच चक्रधरांचा कल राहिला.



'जीवोद्धारव्यसनी अवतार' अशा शब्दांमध्ये चक्रधरस्वामींचे वर्णन होत आलेले आहे. स्वामींच्या अवघ्या व्यक्तिमत्त्वाचे सार इथे गवसते. अधिकारी व्यक्तींना शोधणे, हा त्यांचा निरंतरचा ध्यास राहिला. अशी अधिकारी व्यक्ती हाताला लागली की तिला तिच्या योग्यतेनुसार ज्ञान आणि/अथवा प्रेम देणे, हा स्वामींचा आचारविशेष. पण, मग संपर्कात आलेल्या अनधिकारी मनुष्यमात्रांचे काय, असा प्रश्न कोणाच्याही मनीमानसी उमटावा. मात्र, यांबाबतही स्वामींचा आचारधर्म होताच. अनधिकारी व्यक्तींच्या ठायी वसणारा पापमळ धुवून काढायचा आणि त्यांना अधिकारी बनवायचे, हा चक्रधरांचा चिरंतन शिरस्ता राहिला.

अर्थात, या मागेदेखील चक्रधरस्वामींची यच्चयावत जीवमात्रांकडे बघण्याची विलक्षण वैशिष्ट्यपूर्ण दृष्टी आहे अथवा होती या वास्तवाचा विसर अणुमात्रही पडून चालणार नाही. चक्रधरस्वामींच्या व्यक्तिमत्त्वाचाच केवळ नव्हे तर, त्यांनी प्रवर्तित केलेल्या महानुभाव पंथाच्या मूल्यव्यवस्थेचा जणू गाभाच ठरावा अशी ती जीवनदृष्टी होय. त्या जीवनदृष्टीमधून उत्क्रांत झालेले सृष्टिविषयक तत्त्वज्ञानही तितकेच दिव्य आणि आगळे आहे. जीवमात्र हा मूलतः स्वतंत्र आणि मुक्त आहे व असतो, हा पंथाच्या सा-या मूल्यसंचिताचा केंद्रबिंदू. **'स्वातंत्र्य हा मोक्ष । परतंत्र हा बंध'** या सूत्रामध्ये पंथतत्त्वाचे अवघे सार सामावलेले आहे. साहजिकच, कोणाही जीवाच्या अशा स्वायत्त असणा-या स्वातंत्र्याचा घास घेण्याचा अधिकार कोणासही नाही, हेच अंतिम तत्त्व चक्रधरस्वामी त्यांच्या 'ससीकरक्षण' लीळेद्वारे प्रगट करतात. पाठीमागे लागलेल्या दोन पारध्यांपासून जीव वाचविण्यासाठी चक्रधरांच्या आश्रयाला आलेल्या सशाला अभय दिल्यानंतर त्याच्या पाठलागावर तिथपर्यंत आलेल्या दोन्ही शिका-यांना स्वामी, प्रत्येक जीवाच्या स्वायत्त स्वातंत्र्याचीच जाणीव करू न देतात.

शिका-यांपासून सुटका केल्यानंतर त्या आश्रित सशाला मुक्त करताना चक्रधर, 'महात्मे हो : आता जाए :' असे उद्गार काढतात. सशाला उद्देशून स्वामी 'महात्मे हो' असे जे संबोधन वापरतात त्यांत महानुभाव पंथास असलेल्या 'महात्मा पंथ' या पर्यायी नावाचे सारभूत गाभातत्त्व सामावलेले आहे. ***(कृपया पृष्ठ क्रमांक १३ पाहावे)***

आरोग्य

# रोगांशी लढा, हल्ल्यांचा तिढा

पाकिस्तानमधील खैबर पख्तूनख्वा या अफगाणिस्तानच्या सीमेला अगदी लागून असलेल्या भागातील बन्नू या गावामध्ये पोलिओ लसीकरणाच्या मोहिमेसाठी निघालेल्या एका आरोग्यसेविकेवर दिनांक १२ डिसेंबर २०१९ रोजी हल्ला करण्यात आला आणि तिची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. ज्या रिक्षामधून ती महिला आरोग्यमोहिमेवर निघाली होती त्या रिक्षावरच हल्ला केला. त्या हल्ल्यात ही आरोग्यसेविका तर प्राणास मुकलीच; परंतु तिला घेऊ न जाणा-या रिक्षाचालकालाही हकनाक आपले प्राण गमवावे लागले. आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या प्रसारमाध्यमांनी या विषयाला बातमीच्या स्वरू पात फारशी प्रसिद्धी मात्र दिलेली नव्हती.

विविध देशांतील पोलिओ निर्मूलनाच्या आकडेवारीकडे जागतिक आरोग्य संघटना बारीक लक्ष ठेवून असते. ज्या देशांत अधिक गरज आहे त्या ठिकाणी आरोग्य मोहिमा राबवून लसीकरण करण्याविषयी जागतिक आरोग्य संघटनेकडून आग्रह धरला जातो. जगभरात विविध देशांत पोलिओची किती प्रकरणे आहेत याची आकडेवारी दरवर्षी आरोग्य संघटनेकडे अद्ययावत केली जाते. विविध देश संबंधित रोगांतून मुक्त व्हावेत या उद्देशानेच अशा प्रकारच्या लसीकरण व आरोग्य मोहिमा राबवल्या जातात. पाकिस्तानमधील पोलिओग्रस्त मुलांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत असल्याने ही लसीकरण मोहिम आवश्यक मानली जात होती. पाकिस्तानमध्ये ज्या ठिकाणी आरोग्यसेविकेची हत्या झाली त्या खैबर पख्तुनख्वा या भागातच सर्वाधिक ६८ प्रकरणे आढळून आली होती. यातील २८ प्रकरणे बन्नू या भागात तर शेजारच्या लक्की मारवात या भागात १९ प्रकरणे आढळून आलेली होती. आरोग्यसेविकेची हत्या झाल्याने ही आरोग्यमोहिमच थांबून गेली.

संपूर्ण देशभरात पोलिओ निर्मूलन राबवण्याची घोषणा पाकिस्तानने २२ एप्रिल २०१९ रोजी केली होती. परंतु, त्या नंतरच्या काही दिवसांतच



पाकिस्तानच्या बलुचिस्तान भागात दोन आरोग्यसेविकांवर गोळ्या झाडण्यात आल्या. त्यामध्ये एकीचा मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी झाली. या दोन्ही घटनांचा पोलिस शोध घेऊ लागले असतानाच संयुक्त राष्ट्रांसमवेत काम करणा-या आणखी एका विदेशी आरोग्य सेवकाची खैबर पख्तुनख्वा येथे हत्या झाली. पोलिओचे थेंब तोंडात घेतल्याने मुले आजारी पडतात अशी अफवा समाज माध्यमांवर वेगाने पसरल्याने ही हत्या झाली असावी, असा पोलिसांचा कयास होता. या अफवेमुळे या भागातील २५ हजारांहून अधिक मुलांसह पालकांनी रु ग्णालयात धाव घेतली होती. आरोग्यसेवकांवर होणा-या हल्ल्यांमागे लसीकरण मोहिमेसंदर्भात पसरलेल्या अफवा आणि गैरसमज अधिककरू न कारणीभूत आहेत हे लक्षात येत गेले.

परंतु, हे एकच कारण नव्हते. आरोग्यसेवकांवर या पूर्वीही हल्ले होतच होते. २०१२ सालापासून २०१९ सालापर्यंतची आकडेवारी लक्षात घेतली तर, पाकिस्तानमध्ये जवळपास १०० आरोग्यसेवकांवर हल्ले झाले आणि ते त्यांत मृत्यूमुखी पडले. त्यामध्ये जवळपास निम्म्या महिलाच आहेत. २०१४ साली तर, एका आरोग्यसेविकेचे तिच्या घरातूनच अपहरण करण्यात आले आणि मग छळ करून तिची हत्या करण्यात आली. २०१२-१३ साली कराची आणि पेशावर येथे सहा आरोग्यसेविकांचा प्राणघात करण्यात आला. अर्थातच, आरोग्यसेवकांच्या मृत्यूमागे लसीकरण मोहिम कारणीभूत असल्याचे पाकिस्तान सरकारने उघडपणाने मान्य केले नाही किंवा त्या मागे इतर काही कारणे आहेत का याचाही सुस्पष्ट खुलासा केला नाही.

**पोलिओचे उच्चाटण आणि पाकिस्तान**

जागतिक आरोग्य संघटनेच्या पुढाकाराने Globle Polio Eradiction Initiative (GPEI) ही मोहिम १९९८ सालापासून विविध देशांत राबवण्यात येते. Wild Polio Virus (WPV) या विषाणूचे उच्चाटण करण्यासाठी हे पाऊ ल उचलण्यात आले होते. जागतिक पातळीवर विविध देशांत या मोहिमेला उत्तम यश मिळाले. परंतु, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या देशांतील परिस्थिती लक्षात घेऊ न तिथे आणखी थोडा जोर लावून पोलिओ निर्मूलनासाठी प्रयत्न करणे *(कृपया पृष्ठ क्रमांक १५ पाहावे)*

*(पृष्ठ क्रमांक १० वरून)*

या संदर्भात, मराठीतील एक ज्येष्ठ समीक्षक आणि संतविचारांचे डोळस अभ्यासक प्राध्यापक व. दि. कुलकर्णी यांनी मांडलेले विश्लेषण विलक्षण मार्मिक आणि तितकेच मननीय ठरते. डॉ. कुलकर्णी यांच्या प्रतिपादनानुसार, आश्रयार्थ आलेल्या त्या सशाला मुक्त करताना चक्रधर त्याला 'महात्मा' असे संबोधतात कारण, जो जो म्हणून जीव आहे तो तो महात्मा आहे; जीवात्मा हा मूलतः महात्मा आहे हे चक्रधरांचे अध्यात्मसूत्रच त्यांच्या प्रत्यक्ष कृतीद्वारे या प्रसंगात प्रगटते. चक्रधरांच्या अंतःकरणात ओतप्रोत भरलेली कोमलता सर्वसमावेशक असल्याचे जे दाखले सापडतात त्यांमागील इंगित हेच. सर्व भूतमात्रांशी प्रेममय व्यवहार आणि अहिंसा हेच ईश्वरप्राप्तीचे साधन ही दृढ धारणा या महानुभाव पंथाच्या दोन मार्गदर्शक सूत्रांची बीजे चक्रधरस्वामींनी स्व-आचरणाद्वारे प्रवर्तित केलेल्या अध्यामसूत्रातच रुजलेली आहेत. आपल्या चालण्याने पायाखाली वावरणारी यःकश्चित मुंगीदेखील चिरडली जाता कामा नये, याबाबत सक्त कटाक्ष हवा, असे चक्रधरांचे त्यांच्या शिष्यवर्गाला परोपरीने सांगणे असे.

या सगळ्यांत एक सूत्र अनुस्युत आणि अंतर्भूत आहे. जो स्वतः महात्मा आहे आणि स्वतः महात्मा असल्यामुळेच जगातील प्रत्येक जीवमात्रामध्ये अनुस्युत असलेले महात्मेपण ज्याने जाणलेले आहे अशांनी कोणाचे मन थोडेदेखील दुखावता कामा नये, यांबाबत चक्रधरांचा आग्रह चिरंतन राहिला. महात्मा हा कोणा शरीराची हिंसा तर करत नाहीच पण कोणाच्या मनाची हिंसाही त्याला त्याज्य आहे, हे तत्त्व स्वामींनी त्यांच्या व्यवहाराद्वारे समकालीन समाजाच्या पुढ्यात त्यांच्या लहानसहान लीळांद्वारे समूर्त साकार केले. किंबहुना, शरीराच्या हिंसेपेक्षाही मनाची हिंसा अधिक सूक्ष्म, अधिक भीषण आणि अधिक पापात्मक होय, हे पंथीय शिकवणुकीचे सारतत्त्व ठरते. या संदर्भात, प्राध्यापक कुलकर्णी यांनी त्यांच्या एका लेखात केलेले विवेचन मुळातूनच वाचण्यासारखे आहे. डॉ. कुलकर्णी यांच्या मर्मग्राही आणि विचक्षण प्रतिपादनानुसार, ''महानुभाव पंथाला 'महात्मा पंथ' असेही म्हटले जाते, आणि या पंथातील अधिकारी व्यक्ती यांना 'महात्मा' असे संबोधतात. खरे तर सर्व जीवात्मे तत्त्वतः महात्मेच



होत. 'लीळाचरित्र' हा ग्रंथ महात्म्यांचा जीवनधर्म दृग्गोचर करणारा अपूर्व ग्रंथ आहे. प्रत्यक्ष आचारातून येथे धर्मतत्त्व प्रगटते...महात्मा ही पंथीय पारिभाषिक संज्ञा असली तरी ती मूलतः गुणवाचक, धर्मदर्शक संज्ञा आहे. सृष्टीत ते महात्मेपण पाहणे, अनुभवणे आणि जोपासणे हेच या महानुभाव पंथाचे उद्दिष्ट आणि कार्य आहे....मुंगीसारखा मुका जीव असो, की घाव घालणारा आततायी असो, हे महानुभावित्व अचल, शांत असते. हे महानुभावित्व असणारा पंथ तो महानुभाव पंथ, महात्मा पंथ. अशा महात्म्यांचा धर्म तो महात्मा-धर्म. 'लीळाचरित्र' हे महात्मा धर्माचे आचाररूप जिवंत चित्र होय..''...आपण ज्या विश्वाचे घटक आहोत त्या विश्वातील कणाकणांत सामावलेले 'महात्मे'पण जागविणारी, जपणारी ही चक्रधरप्रणीत जीवनदृष्टी आज आठ शतकांनंतरही तितकीच प्रस्तुत आहे, यांबद्दल आता तरी कोणालाच शंका नसावी. चक्रधरस्वामींच्या ८००व्या जयंती वर्षादरम्यान, म्हणूनच, आवर्जून जागरण घडवायचे ते त्याच जीवनदृष्टीचे ! ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५** **किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

*(पृष्ठ क्रमांक १२ वरून)*

गरजेचे आहे असे वाटल्याने या देशांत लसीकरण मोहिमांचे आयोजन करण्यात आले होते. परंतु, मोहमांमध्ये अग्रणी असलेल्या आरोग्यसेवकांवरच होणा-या हिंसक हल्ल्यांमुळे या मोहिमांना खीळ बसते आहे. लसीकरणा-या मोहिमेसाठी येणा-या आरोग्यसेवकांच्या चमूवर पाकिस्तानच्या ठराविक भागांमध्ये लोकांचा अविश्वास असल्याने आणि आरोग्यसेवकांवर होत असलेल्या हल्ल्यामुळे त्यातील वास्तवाकडे डोळेझाक करता येत नाही.

रशियाने अफगाणिस्तानमध्ये फौजा घुसवल्यानंतर तिथून बाहेर पडून पाकिस्तानमधील खैबर पख्तुनख्वा आणि बलूचिस्तान या ठिकाणी निर्वासित म्हणून आलेल्या अफगाणी लोकांची संख्या मोठी आहे. अशा निर्वासितांना कोणत्या हालाखीच्या परिस्थितीत राहावे लागत आहे आणि जगाचे तिकडे लक्ष वेधले जावे म्हणूनदेखील त्या भागात जाणा-या आरोग्यसेवकांवर हल्ले होत असावेत, असे या विषयाचा अभ्यास करणा-या जाणकारांचे मत आहे. मात्र, ठराविक भागांत वारंवार होणा-या हल्ल्यांमुळे Globle Polio Eradiction Initiative (GPEI) या मोहिमेच्या यशस्वी पूर्ततेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झालेले आहे. आरोग्यसेवकांवर होणारे हल्ले लक्षात घेता, सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकणा-या संवेदनशील भागांत त्यांना पाठवणे टाळले जाते. सर्वेक्षण आणि लसीकरण मोहिमा राबवताना परिस्थितीजन्य अशी काही सूट देणे भाग पडते. परंतु, त्यामुळे लसीकरण मोहिमेची परिणामकारकता आणि गुणवत्ता घटते, असे आरोग्यतज्ज्ञांच्या निदर्शनास आले आहे.

**विश्वासार्हतेचा अभाव**

लसीकरण मोहिमांबाबत पाकिस्तानमध्ये अविश्वास असण्याची अन्य कारणेही आहेत. विविध देशांत सुरूअसलेल्या लसीकरण मोहिमांना पाठबळ देण्यासाठी १९८० साली अमेरिकेने 'सेंटर फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन'ची (सीडीसी) मदत घेतली होती. त्या अंतर्गत, अमेरिकेतील एक अनुभवी डॉक्टर Mary Guinan यांना पाकिस्तानमध्ये सर्वेक्षणासाठी पाठवण्यात आलेले होते. पाकिस्तानमधील अफगाणी निर्वासितांच्या छावण्यांमध्ये राहणा-या लोकांच्या आरोग्याची स्थिती काय आहे या संदर्भात



पाहणी करून त्या अहवाल सादर करणार होत्या. त्यांच्या मदतीला आणखी काही आरोग्यसेवकांचा एक चमू देण्यात आला. सर्व छावण्यांना भेटी देऊन तेथील लहान मुलांची उंची व वजन मोजून आरोग्यविषयक काही प्रश्न विचारून एका प्रश्नावलीमध्ये ती माहिती भरण्याबाबत त्यांना सांगितले गेले. त्या माहितीचा एकत्रित अहवाल त्या सादर करणार होत्या. परंतु हा सगळा देखावा होता. जी माणसे त्यांच्यासमवेत आरोग्यसेवक म्हणून फिरत होती ती वस्तुतः 'सीआयए' या अमेरिकी गुप्तहेर संघटनेचे खबरे होते. अफगाणिस्तानमधून आलेल्या निर्वासितांच्या छावण्यांमधील वस्तुस्थिती पाहण्यासाठी त्यांना नेमलेले होते. या गुप्त मोहिमेचा सुगावा पाकिस्तानला लागू नये म्हणून आरोग्यमोहिमेचे निमित्त करून डॉक्टरांना पुढे केले होते, हे वास्तव यथावकाश उघड झाले. त्यामुळे पाकिस्तानमधील लोकांना लसीकरण मोहिमांवरील विश्वास उडाला. पाकिस्तानच्या अनेक भागांमध्ये अमेरिकेविषयी आणि अशा आरोग्यमोहिमांविषयी अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले.

१९७९ सालानंतर जेव्हा रशियाने अफगाणिस्तानमध्ये ठेवलेले आपले सैन्य हलवायला सुरुवात केली त्यानंतर अफगाणिस्तानची परिस्थिती आणखी बीकट होत गेली. अफगाणिस्तान सोडून बाहेर पडलेले अनेक निर्वासित पाकिस्तानात आले. अफगाणिस्तानच्या सीमेलाच लागून असलेल्या खैबर पख्तुनख्वा या पाकिस्तानमधील भागांत चार लाखांहून अधिक लोक राहत होते. या सगळ्या पार्श्वभूमीवर, संशयाच्या वातावरणात आरोग्यसेवकांवर हल्ले सुरू झाले आणि त्यात अनेक आरोग्यसेवक मारले गेले. पोलिओ लसीकरण मोहिम प्रभावीपणाने राबवण्यासाठी घराघरांत पोहोचणे, घरातील व्यक्तींना त्याची माहिती देणे आणि लसीकरण मोहिम यशस्वी करणे आवश्यक असते. परंतु, ते या भागात असलेल्या वातावरणामुळे शक्य होत नव्हते. त्यामुळे महिलांचे प्रतिनिधीत्व अधिक प्रभावी ठरेल या विचारांतून Female Frontline Health Worker अशी कल्पना पुढे आली. त्यात अनेक महिलांना यात सहभागी करून घेण्यात आले. पाकिस्तानमध्ये Female Community Volentiers (एफसीव्ही) ही योजना राबविण्यात आली आणि तिला चांगला प्रतिसादही मिळाला.

Safeguard Health या जागतिक स्तरावरील संघटनेने केलेल्या अभ्यासानुसार, युक्रेन, सीरिया, अफगाणिस्तान, इराक, इजिप्त, लिबिया, सुदान, येमेन, सोमालिया आदी विविध देशांमध्ये आरोग्यसेवकांवर हिंसक हल्ल्यांच्या घटना घडलेल्या आहेत. जगभरातील अशा २० देशांमधील नोंद झालेल्या घटनांचा आढावा घेतला असता १२०० हून अधिक हिंसक घटना २०१९ सालामध्ये घडलेल्या आहेत. त्यामध्ये १५१ आरोग्यसेवकांना आपले प्राणही गमवावे लागले आहेत. २०१८ साली ९८३ आरोग्यसेवकांवर हिंसक हल्ले झालेले होते. आरोग्यसेवक ज्या वाहनांतून बाहेर पडतात त्या वाहनांचे नुकसानही अशा घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर केले जाते असे लक्षात आले. अभ्यास केलेल्या २० देशांपैकी १४ देशांमध्ये आरोग्यसेवकांच्या वाहनांची तोडफोड केलेली अथवा ती वाहने रस्त्यावरच जाळून टाकलेली होती. २०१९ साली एकूण १५ देशांमध्ये ९० हून अधिक आरोग्यसेवकांच्या अपहरणाच्या घटना घडल्या तर १९ देशांमध्ये २१६ हून अधिक ठिकाणच्या आरोग्य सेवा केंद्रांची नासधूस करण्यात आली. २०१९ सालच्या सप्टेंबर महिन्यात अफगाणिस्तानमध्ये तालिबानी दहशतवाद्यांनी एका रुग्णालयावर बॉम्बहल्ला केला. त्यामध्ये २० लोक ठार झाले तर ९७ लोक जखमी झाले. या हल्ल्यात रुग्णासह आरोग्यसेवकांचाही समावेश होता. सीरियामध्ये २०१९ साली ३४ आरोग्यसेवाकेंद्रांवर हल्ल्याच्या घटना घडलेल्या आहेत. इबोला किंवा पोलिओ यांसारख्या रोगांपासून बचाव करण्यासाठी राबवण्यात येणा-या लसीकरण मोहिमेच्या दरम्यान हे हल्ले झालेले होते. त्यामुळे आरोग्यसेवकांच्या जीविताचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. त्यांचे मनोधैर्यही अशा घटनांमुळे ढळते आहे.

अन्य देशांच्या तुलनेत पाकिस्तानमध्ये पोलिओग्रस्त बालकांचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आल्याने २०१९ सालच्या एप्रिल महिन्यात तिथे दहा लाखांहून अधिक बालकांना पोलिओ डोस देण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. परंतु, आरोग्यसेवकांवर झालेल्या हल्ल्यांमुळे ही मोहिमसुद्धा अर्ध्यावरच थांबवावी लागली. नायजेरिया आणि अफगाणिस्तान या देशांतील परिस्थितीही या बाबतीत गंभीर आहे. तिथेदेखील अशाच हिंसक घटनांमुळे पोलिओविरोधातील आरोग्य मोहिम अनेकदा रद्द करावी लागली होती.



तिथेही आरोग्यसेवकांवर हल्ले करून त्यांच्या हत्या केल्या जातात. अफगाणिस्तानमध्येदेखील जागितक आरोग्य संघटनेच्या माध्यमातून त्या देशात पाठवल्या जाणा-या कोणत्याही आरोग्यसेवकांना प्रवेशासदेखील तालिबानने प्रतिबंध केलेला आहे. आरोग्यसेवकांवरील हल्ल्यांप्रमाणेच विविध रुग्णालयांमध्ये काम करणा-या परिचारिकांवर होणारे हल्ले हासुद्धा तितकाच चिंतेचा विषय आहे. इबोला, पोलिओ या रोगांच्या संदर्भात विविध देशांत आरोग्यमोहिमा राबवल्या जातात. तसेच अगदी अलीकडे जगभरात कोरोनाचेही थैमान सुरू आहे. अशा वेळी आरोग्यसेवकांची पथके गरजेनुसार तैनात केली जातात आणि हे लोक आपले जीव धोक्यात घालून आरोग्यसेवेचे कर्तव्य बजालतात. मात्र, त्यांच्यावरच जेव्हा हल्ले केले जातात आणि त्यांना हुसकावून लावले जाते तेव्हा मात्र ती चिंतेची बाब ठरते.

या सगळ्याचे परिणामही दिसून येत आहेत. पाकिस्तानमध्ये २०१८ साली जितके पोलिओचे रुग्ण आढळले होते. त्या संख्येच्या प्रमाणात २०१९ साली वाढ झाल्याचे दिसून आले आहे. २०१९ साली पाकिस्तानात पोलिओची १४० प्रकरणे आढळून आलेली आहेत. या सगळ्या पार्श्वभूमीवर, जीव धोक्यात घालून आरोग्यमोहिमा राबवणा-या आरोग्यसेवकांवर हल्ले होणे ही निश्चितच गंभीर बाब आहे. अनेकदा अशा हल्ल्यांमागील वास्तव समोरही येत नाही. काही घटनांची पोलिसदरबारी अधिकृतपणे नोंदही होत नाही. त्यामुळे आरोग्यसेवकांवर होणा-या हल्ल्यांची अधिकृत आकडेवारी दिसते त्यापेक्षा प्रत्यक्षात निश्चितपणे अधिक असावी, असा या क्षेत्रात काम करणा-या सामाजिक संस्थांचा कयास आहे. वस्तुतः आरोग्यसेवक आणि परिचारिकांवरील हल्ल्यांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे आणि हे हल्ले होऊ नयेत म्हणून कोणत्या ठोस उपाययोजना आवश्यक आहे याविषयी विचारमंथन गरजेचे आहे. त्यादृष्टीने अंमलबजावणीही होणे आवश्यक आहे. एकीकडे साथीच्या रोगांचे व गंभीर आजारांचे निर्मूलन होणे गरजेचे असताना त्यासाठी प्रयत्नशील असणा-या आरोग्यसेवकांनाच जीव मुठीत घेऊन काम करावे लागणे हे काही चांगले चिन्ह नाही. त्यामुळे आरोग्यसेवकांना भविष्यात तरी सुरक्षित वातावरणात आरोग्यमोहिमा राबवता येणे ही काळाची गरज आहे. ■■

जिकडे-तिकडे

# मोटरगाड्यांचा हवाईप्रवास!

हवेत उडू शकणा-या गोष्टींचे आकर्षण माणसाला फार पूर्वीपासून आहे. आकाशातून इकडून तिकडे सहज उडत जाऊ शकणा-या पक्ष्यांना पाहून, आपल्यालाही असे उडता यायला हवे, किमानपक्षी असे काही तरी साकारावे ज्यातून उडत जाता येईल, ही इच्छा माणसाला काही केल्या स्वस्थ बसू देत नव्हती. त्याच उर्मीतून, मग, अंगाला पंख बांधून उडण्याचे प्रयत्न माणसाने अनेकदा केले. 'पॅराग्लायडिंग' किंवा 'स्कायडायव्हिंग' हे अशाच प्रयत्नांचे आधुनिक स्वरूप. एकत्रित बसून एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी लोकांना उडत जाता यायला हवे या विचारांतूनच अनेक प्रयोग करण्यात आले. अंतिमतः, राइट बंधूंच्या प्रयत्नांतून विमानाचा शोध लागला आणि माणसाचे उडण्याचे स्वप्न साकार झाले. हळूहळू त्यात सुधारणा होत गेली.

आजमितीला हवाई प्रवासातील अप्रूप संपले असून ते प्रवासाच्या अनेक पर्यायी माध्यमांपैकी एक असे सर्वसाधारण साधन बनले आहे. हवाई प्रवासासाठी विमान होतेच पण त्यातही खासगीपण कसे जपता येईल, या विचारांतून हेलिकॉप्टरचा शोध लागला. परंतु, इथे थांबेल तो माणूस कसला! सतत नवशोधनाची उर्मी त्याला स्वस्थ बसू देईना. हवेतून उडत प्रवास करू शकणारी मोटरगाडी तयार करावी असे स्वप्न उराशी बाळगून गेल्या अनेक दशकांपासून देशोदेशी प्रयोग सुरू होते. स्वप्नवत वाटणारी ही कल्पना कधी प्रत्यक्षात येईल असे वाटले नव्हते. या पूर्वीच्या अनेक प्रयोगांना अपयशदेखील आलेले होते. परंतु, अलीकडेच जपानमधील एका वाहनउत्पादक कंपनीला यात यश मिळाले असून त्यामुळे उडत्या मोटरगाडीचेही स्वप्न प्रत्यक्षात येण्याची आशा निर्माण झालेली आहे. आकाशातून उडत जाणा-या मोटरगाड्या यथावकाश दिसू लागल्यास आश्चर्य वाटण्याचे काही कारण उरणार नाही.



जपानमधील SkyDrive Inc या कंपनीने हे संशोधन यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. जपानमधील 'टोयोटा टेस्ट फिल्ड' या वार्षिक उपक्रमामध्ये कंपनीने त्याचे खुल्या मैदानात प्रत्यक्ष सादरीकरणही केले. मोटरगाडीमध्ये चालक बसून तो हवेमध्ये मोटरगाडी चालवू शकतो, याचे प्रात्यक्षिकही दाखवण्यात आले. त्यामुळे, भविष्यात हवेतून जाणा-या मोटरगाड्या घेण्याची इच्छा बाळगून असणा-या अनेकांच्या आशा पल्लवित झालेल्या आहेत. हवेतून प्रवास करू शकणा-या अशा मोटरगाड्या २०२३ सालापर्यंत बाजारात आणण्याचा विश्वास या कंपनीने व्यक्त केला आहे. दोन वर्षांच्या अथक संशोधनानंतर अशी हवेतून जाऊ शकणारी जगातील पहिली मोटरगाडी कंपनीला साकारता आली. आगामी काळात, वाहनउद्योगात क्षेत्रातील कंपन्यांसाठी हीच नवीन बाजारपेठ असणार आहे. तिची पायाभरणी या निमित्ताने झालेली आहे. उडणा-या मोटरगाड्या येत्या दशकभरात सर्वत्र दिसू लागतील, असा अंदाज SkyDrive Inc या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी Tomohiro Fukuzawa यांनी व्यक्त केला आहे.

भविष्यातील आरामदायी प्रवासाची ही एक नवीन सुरुवात ठरेल, असा विश्वास वाहनउद्योगाशी संबंधित जाणकारांना आहे. अतिशय सुरक्षित, सोयीस्कर असा प्रवास या माध्यमातून करता येणार असल्याने आगामी काळात हवाईसफर करू शकणा-या अशा मोटरगाड्यांनाच अधिक मागणी असेल. विविध देशांमध्ये होत असलेली वाहतूककोंडी, वाहतुकीच्या अनेकानेक समस्या, त्यामध्ये वेळेचा तसेच इंधनाचा होणारा प्रचंड अपव्यय आणि लोकांची होणारी गैरसोय कमी करता यावी म्हणून नव्या पर्यायांचा शोध घेणे भाग आहे. केवळ रस्ते मोठे करून आणि वाहनांचे आकार लहान करून ही समस्या सुटू शकणार नाही; तर, अशा नाविन्यपूर्ण कल्पनांद्वारेच त्यावर काही तोडगा काढता येईल, असा विश्वास या विषयातील जाणकार व्यक्त करीत आहेत.

उडत्या तबकड्यांप्रमाणेच उडणा-या मोटरगाड्यांची कल्पनादेखील वैज्ञानिक काल्पनिक कथांमध्येच प्रामुख्याने केली जात होती. उडत्या मोटरगाडीच्या किंवा 'फ्लाइंग कार'च्या संशोधनाला प्रत्यक्षात सुरुवात झाली ती १९३६ साली. Henry Ford यांनी सर्वप्रथम एकट्याने बसून

उडता येईल असे विमानाचे एक प्रारूप तयार केले होते. त्याला नाव दिले होते Sky Flivver. अर्थात, ही उडणारी मोटरगाडी नक्कीच नव्हती. मात्र, त्या दिशेने जाण्याची ही सुरुवात मात्र खचितच होती. १९४० साली Henry Ford यांनीच दावा केला होता, की येणाऱ्या काळात उडणारे विमान आणि रस्त्यावरून धावणाऱ्या मोटरगाड्या यांचा मिलाफ होऊन नवेच काही साकारलेले पाहायला मिळेल. त्या वेळी त्यांचे वक्तव्य सर्वांनीच हसण्यावारी नेले होते. परंतु, आता मात्र तसे खरोखर होत असल्याचा प्रत्यय येऊ लागलेला आहे.

अमेरिकन अभियंता Molt Taylor यांनी Aerocar या नावाने उडणारी मोटरगाडी १९४९ साली प्रत्यक्षात साकारलीसुद्धा होती. १९५६ साली अमेरिकेतील नागरी उड्डाण प्राधिकरणाने तिच्या उत्पादनाला मान्यतादेखील दिलेली होती. परंतु हवाईप्रवास करू शकणारी अशी मोटरगाडी प्रत्यक्षात आणण्याचे स्वप्न मात्र अधुरेच राहिले. Molt Taylor यांनी सहा Aerocar तयार केलेल्या होत्या. हवाई प्रवास करू शकणारी मोटरगाडी त्यामध्ये अद्ययावत सुधारणांसह १९८९ साली पुन्हा तयार केलेली होती. परंतु, ती व्यावसायिक तत्त्वावर बाजारात येऊ मात्र शकली नाही. परंतु, या दरम्यानच्या काळामध्ये फोर्ड कंपनीने एक पाऊल पुढे टाकले. कंपनीच्या अद्ययावत अशा डिझाइन स्टुडिओमध्ये Volante Tri-Athodyne या मोटरगाडीची संकल्पना सादर करण्यात आली होती. प्रत्येकास स्वतंत्र मोटर बसवलेले तीन पंखे तिच्यामध्ये बसवलेले होते. त्यामुळे त्यांच्या बळावर ही मोटरगाडी जमिनीपासून वर उचलली जाऊन अन्यत्र प्रवास करू शकणार होती. हवेत उडू शकणारी अशी मोटारगाडी आता लवकरच प्रत्येक घरासमोर दिसू लागेल, असा दावाही त्या वेळी कंपनीने केलेला होता. अमेरिकी लष्करातील वाहतूक संशोधन विभागाने उडणारी जीप तयार करण्यासाठी १९५६ साली संशोधन सुरू केलेले होते. त्यासाठी आवश्यक असणारे आरेखनही तयार करण्यात आले होते आणि काही प्रतिरूपेदेखील साकारली होती. परंतु, प्रत्यक्ष युद्धाच्या वेळी अशा प्रकारची उडणारी वाहने फारशी उपयोगी ठरणार नाहीत, असे वाटल्याने संशोधन थांबवण्यात आले.



पुढील दोन दशकांमध्ये या दिशेने खूप चर्चा होत राहिल्या. मात्र, ठोस यश कुणाच्याच पदरात पडले नाही. त्या नंतर, अगदी अलीकडे २०१७ साली अनेक नामांकित बहुराष्ट्रीय वाहनउत्पादक कंपन्यांनी 'इलेक्ट्रिक फ्लाइंग कार' बनवण्यासाठी पुढाकार घेतल्याचे लक्षात आले. Kitty Hawk Corporation या अमेरिकी एअरक्राफ्ट उत्पादन कंपनीने Flyer ही उडणारी मोटरगाडी तयार केल्याचा दावा केला. परंतु, ही मोटरगाडी फक्त पाण्यावरून उडू शकते, अशी तिची मर्यादा असल्याने तिला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. हे सारे प्रयोग होत असले तरीही अंतिमतः हे संशोधन विमानाच्या तंत्रज्ञानाकडेच अधिक झुकत होते. त्यामुळे 'फ्लाइंग कार' म्हणून त्याचे वेगळेपण सिद्ध करता येत नव्हते. मग हळूहळू या स्पर्धेत चीनसुद्धा उतरला. Terrafugia या चिनी कंपनीने प्रथमतः चार माणसे बसून रस्त्यावरून तसेच हवेतून प्रवास करू शकतील असे TF-X हे वाहन तयार केले. प्रत्येक उड्डाणामध्ये ८०० किलोमीटर इतके अंतर पार करण्याइतपत त्याची क्षमता होती. २०१२ साली प्रयोगशाळेमध्ये साकारलेले हे तंत्रज्ञान वाहनाच्या रूपाने रस्त्यावर येत्या आठ-दहा वर्षांत अवतरेल, असा अंदाज होता. परंतु, अद्याप तरी चीनला त्यात यश आलेले दिसत नाही. या जागतिक स्पर्धेमध्ये उतरत आता रशियानेदेखील त्या दिशेने संशोधन करण्यास सुरुवात केलेली आहे. त्याचप्रमाणे, तुर्कस्तानमधील Baykar ही आघाडीची कंपनीदेखील Cezeri नावाची उडू शकणारी मोटरगाडी तयार करण्याच्या प्रयत्नांत आहे.

तूर्तास तरी या सगळ्या प्रयत्नांमध्ये जपानला एक मोठे यश प्राप्त झालेले दिसते. या संदर्भातील जपानच्या चाचण्याही यशस्वी झालेल्या असल्याने हवेतून प्रवास करण्यासाठी उडू शकणाऱ्या मोटरगाड्या बाजारपेठेत दाखल होतील, असा आशावादवजा दावा केला जातो आहे. त्यामुळे आता, आकाशात विहरणाऱ्या पक्ष्यांप्रमाणे, आकाशात झेप घेणाऱ्या विमानांप्रमाणेच आगामी काही काळात मोटरगाड्याही इकडून तिकडे उडत जाताना दिसल्या तर आश्चर्य वाटावयास नको. माणसाने अनेक वर्षांपासून जपलेले एक स्वप्न आता प्रत्यक्षात साकारते आहे. चला तर मग, या नव्या उडत्या मोटरगाडीमधून हवाईप्रवास करायला आपणही सज्ज होऊ या! ■■

पुरवणी

# साठी (राजकीय) बुद्धी नाठी? (!)

**- डॉ. अभय दातार**

'कोव्हिड-१९'चा उद्रेक आणि त्या नंतर भारत-चीन यांच्या दरम्यान वाढत चाललेला तणाव यामुळे महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला २०२० साली ६० वर्षे पूर्ण झाली ही बाब काहीशी विसरली जाणे एका अर्थाने स्वाभाविकच होते. या सहा दशकांच्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात अमूलाग्र असे बदल झाले आहेत. त्यातील एक प्रमुख बाब म्हणजे, डाव्या विचारसरणीच्या विविध छटांचे प्रतिनिधित्व करणा-या पक्षांचा -हास. काँग्रेसला प्रतिस्पर्धी ठरू शकण्याची क्षमता असणारा शेतकरी-कामगार पक्ष हा पार आक्रसून गेला आहे तर, २०१९ सालच्या विधानसभा निवडणुकीत एका मतदारसंघात यश मिळवून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने आपण अजून तरी अस्तित्वात आहोत हे सिद्ध केले आहे. दुसरीकडे, एकेकाळी अगदी परिघस्थ असणा-या हिंदुत्ववादी विचारसरणीचा उद्घोष करणारा भारतीय जनता पक्ष दोनदा सत्ता उपभोगतो आहे. तसेच, मुंबई-ठाणे पट्ट्यापुरता मर्यादित असलेला शिवसेना पक्ष आता राज्यभरात विस्तारला आहे.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे, महाराष्ट्राचे झपाट्याने होणारे शहरीकरण. हे बदल होत असले तरी काँग्रेसने आपले स्थान पूर्णतः गमावलेले नाही. इथे 'काँग्रेस' म्हणत असताना 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' आणि 'राष्ट्रवादी काँग्रेस' हे दोन्ही पक्ष अभिप्रेत आहेत. या दोन्ही पक्षांचे नेतृत्व वेगवेगळे असले तरी त्यांना एकाच राजकीय नाण्याच्या दोन बाजू समजणे अधिक योग्य होईल. मात्र, हे सर्व बदल १९९० च्या दशकादरम्यान, किंवा त्या नंतर झालेले आहेत. त्या पूर्वी काय परिस्थिती होती हे पाहणेदेखील तितकेच गरजेचे आहे. १९५६ साली यशवंतराव चव्हाण जुन्या द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. काँग्रेसअंतर्गत जुने अभिजन शहरी नेतृत्व मागे पडत गेले आणि त्याची जागा बहुजन समाजातील ग्रामीण नेतृत्वाने



घ्यायला सुरुवात केली. काँग्रेसचा पाया राज्यात अधिक पक्का व्हावा या दृष्टीने १९६० साली महाराष्ट्राच्या सत्तास्थापनेपासूनच चव्हाण यांनी पद्धतशीर प्रयत्न सुरू केले. इतर पक्षांतले विशेषतः शेतकरी-कामगार पक्षातील बहुजन समाजातील नेते-कार्यकर्ते त्यांनी काँग्रेसमध्ये आणले तर, दुसरीकडे स्थानिक स्वराज्य संस्था बळकट केल्या. सहकारी संस्थांना, विशेषतः सहकारी साखर कारखान्यांना, प्रोत्साहन देत कार्यकर्त्यांच्या नव्या फळीला सत्तेची आणि जबाबदारीची स्थाने निर्माण करून दिली. परिणामस्वरूप राजकीय प्रक्रिया काँग्रेसकेंद्रित झाली आणि ती दीर्घकाळ टिकली. काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजीचे स्वरूप जोपर्यंत मर्यादित होते तोपर्यंत पक्षाच्या सत्तेवरील पकडीला कोणतेही तगडे आव्हान मिळाले नाही. १९६९ सालच्या काँग्रेस फुटीचा महाराष्ट्रावर फारसा परिणाम झाला नाही. १९७८ साली मात्र काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. त्या नंतर १९८६ सालापर्यंत शरद पवार यांनी काँग्रेस धाटणीचाच परंतु काँग्रेसपेक्षा पक्ष म्हणून भिन्न असलेला नवा पर्याय मांडला. हाच पर्याय त्यांनी १९९९ साली 'राष्ट्रवादी काँग्रेस'च्या रूपाने पुढे आणला.

त्या पूर्वी, १९९१ मध्ये भारताने उदारीकरणाच्या आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा स्वीकार केला होता. याचा महाराष्ट्रावर पुष्कळ परिणाम झाला. औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख अगोदरपासूनच होती. त्याचा फायदा घेत महाराष्ट्राने मोठ्या प्रमाणात परकीय आणि देशी औद्योगिक गुंतवणुकीला आकृष्ट केले. अर्थात, ही गुंतवणूक प्रामुख्याने आधीच औद्योगिकदृष्ट्या प्रगत असणा-या पश्चिम महाराष्ट्राकडे आली. त्यातच विविध जिल्ह्यांच्या ठिकाणी असलेल्या स्थानिक उद्योगांना १९८० च्या दशकातच घरघर लागलेली होती. उदारीकरणाच्या पर्वात ते उद्योग काळाच्या पडद्याआड गेले. ब-यापैकी तीव्र असलेला प्रादेशिक असमतोल यामुळे अधिक वृद्धिंगत झाला. गुंतवणूक आकृष्ट करण्याच्या या सर्व प्रक्रियेचा विदर्भ आणि मराठवाडा यांना फारसा फायदा झाला नाही.

जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेने शहरीकरणाला एक वेगळा आयाम दिला. मुंबईसारख्या शहराच्या निर्औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात

झाली. कापडगिरण्यांच्या व्यवसायापेक्षा त्यांच्या जमिनीला अधिक बाजारभाव येऊ लागले. मुंबई-ठाणे पट्ट्यातून विविध कारणांमुळे कारखाने बाहेर पडले आणि त्यांची जागा महागड्या टोलेजंग इमारती आणि सुसज्ज, अत्याधुनिक मॉल यांनी घेतली. माहिती-तंत्रज्ञान आणि कारखानदारी यांच्या विस्ताराने पुणे परिसरातील शहरालगतच्या जमिनींच्या किंमती चांगल्याच वधारल्या आणि 'गुंठा मंत्री' नावाचा एक नवीन समाजघटक अस्तित्वात आला. विदर्भ-मराठवाड्याच्या विकासाची गती आधीच मंद होती ती या काळात अधिकच मंदावली. त्यात भर पडली ती शेतीक्षेत्रातील संकटाची. कृषिक्षेत्रातील घटती सार्वजनिक गुंतवणूक, सिंचनाच्या सुविधांचा वाढता अभाव, उत्पादन खर्चात वाढ आदी बाबींमुळे शेतीचा किफायतशीरपणा कमी होऊ लागला. शेतक-यांना स्वातंत्र्याचे आश्वासन देणारी सहकार चळवळही याच काळात घराणेशाहीच्या तावडीत सापडली. नेतृत्वाने ज्यांच्या जिवावर राजकारण केले त्यांनीच ते माध्यम गिळंकृत करून त्याचे रुपांतर खाजगी उद्योगांत करून टाकले.

हा काळ राजकारणातील एका वेगळ्या प्रकारच्या लोकशाहीकरणाचा होता. १९९० च्या दशकात मंडल आयोगाची राज्यात अंमलबजावणी झाली आणि 'ओबीसी' ही एक नवीन कोटी राजकारणात अवतरली. 'बहुजन' या कोटीक्रमाशी स्पर्धा करणा-या या नव्या कोटीक्रमाने अनेक समाजघटकांना जागृत केले. या जागृतीचा फायदा काँग्रेसेतर पक्षांनी घेतला. या मध्ये पहिल्या टप्प्यात सर्वाधिक यश भाजप-शिवसेनेने मिळवले. शरद पवार यांच्या राजकीय व्यूहरचनांमुळे काँग्रेसलादेखील त्याचा मर्यादित प्रमाणात फायदा झाला. याच जागृतीमुळे निवडणुकीच्या आखाड्यातील स्पर्धा अधिक तीव्र झाली. नव्याने जागृत झालेल्या या समाजघटकांकडून विविध प्रकारच्या मागण्या राज्यसंस्थेकडे केल्या जाऊ लागल्या. इतकी दशके राजकारणावर आपली पकड असणा-या पारंपरिक समाजघटकांनी सुरुवातीला बचावात्मक पवित्रा घेतला तर काही काळानंतर तशाच प्रकारच्या मागण्या करायला सुरुवात केली. आपले स्थान टिकवण्याच्या उद्देशानेच या मागण्या करण्यात आल्या. मात्र, याच काळात राज्यसंस्थेची देण्याची क्षमतादेखील आक्रसत गेली. विविध क्षेत्रांतून राज्यसंस्थेने अंग काढून घेतले. महाराष्ट्रासारख्या



राज्याची आर्थिक परिस्थितीदेखील या काळात नाजूक होत गेली. राज्यभर विखुरलेल्या, अर्धवट पूर्ण झालेल्या विविध योजना किंवा पूर्ण झालेल्या सुमार दर्जाच्या योजना हा त्याचा पुरावा होय.

एकीकडे मागण्यांचा वाढता जोर तर दुसरीकडे त्या पूर्ण करण्याची घटती क्षमता अशा दुहेरी कात्रीत राज्य सापडले. त्यावर उपाय निघाला तो अस्मितेच्या राजकारणाचा. प्रत्येक पक्ष प्रत्येक समाजघटकाला काही तरी प्रतिकात्मक आश्वासने देऊ लागला. एखाद्या थोर व्यक्तींचे नाव विद्यापीठाला द्या, लोकोत्तर व्यक्तिमत्त्वांची भव्य स्मारके उभारा किंवा त्यांच्या नावाने योजना सुरू करा या अशा मागण्या-आश्वासनांचा एक प्रकार तर, आरक्षणाच्या मागण्या हा दुसरा प्रकार. या अस्मिताकेंद्री वातावरणामुळे १९९० पर्यंत भौतिक विकासाचे जे मुद्दे नावापुरते का होईना राजकारणाच्या केंद्रस्थानी असायचे ते परिघस्थ होत गेले आणि काही वेळा तर चक्क नाहीसे झाले.

या काळातच निवडणुकांचे आणि राजकीय प्रक्रियेचे अर्थकारण बदलत गेले. स्पर्धा तीव्र होत गेली तसा खर्च वाढत गेला. राजकारणात प्रवेश करण्याची इच्छा असेल तर पक्षनिष्ठा, लोकसंपर्क आदी पूर्वअटी मागे पडल्या आणि 'आर्थिक क्षमता अधिक असणे' हा निकष महत्त्वाचा ठरू लागला. राजकारणात टिकून राहायचे असेल तर हाताशी कार्यकर्ते हवे, त्यांना टिकवायचे असेल तर स्वतःची आर्थिक ताकद हवी किंवा प्रमुख कार्यकर्त्यांच्या उत्पन्नाची सोय लावायला हवी. राजकारणातील अभिजनांच्या वाढत्या भ्रष्टाचारामुळे 'कार्यकर्ता-नेता' हे नाते बदलू लागले. जनतेचे प्रश्न हाती घेत लोकसंपर्क वाढवत निवडणुकीची गणिते तयार करायची ही पद्धत आणखीनच मागे पडत गेली. उमेदवारी देण्यासाठी 'निवडून येण्याची क्षमता' (Electoral Merit) हा मुख्य निकष झालेला दिसतो. ही क्षमता मुख्यतः आर्थिक आहे, ही काही लपून राहिलेली बाब नाही. यातून राजकारणाला मुख्यतः आता देवाणघेवाणीच्या व्यवहाराचे (Transactional) स्वरूप आले आहे. म्हणजे, कार्यकर्त्यांची निष्ठा नेत्याप्रती का असते तर त्याच्या किंवा तिच्याकडून काहीतरी आर्थिक लाभ मिळतो म्हणून. हा लाभाचा ओघ घटला किंवा अधिक आकर्षक पर्याय मिळाला की

कार्यकर्ते दुसरा पर्याय शोधायला मोकळे. याला वैयक्तिक महत्वाकांक्षेची किनारही असते. हेच जिल्हा आणि राज्य पातळीवर घडते आहे. राजकारणात असलेल्यांपैकी अनेकांचे व्यवस्थेत आर्थिक स्वरूपाचे हितसंबंध निर्माण झालेले आहेत. ते जपले जावेत ही प्रत्येकाची स्वाभाविक अपेक्षा असते. त्यामुळे जो कोणी सत्ताधारी असेल त्याची आपल्यावर खप्पा मर्जी होणार नाही हे पाहणे, ही प्रत्येकाची गरज बनते. मोठ्या प्रमाणात होणा-या पक्षांतराच्या मागचे हेच कारण असावे. अन्यथा, निवडणुकीत शिवसेनेत असणारे काँग्रेस किंवा राष्ट्रवादीकडे थोडा काळ विसावा घेत भाजपमध्ये का बरे जात असतील? इतरांच्या बाबतीत या प्रवासातील टप्प्यांचा क्रम नक्कीच वेगळा असेल, मात्र प्रवासाचे कारण सारखेच असणार. असे प्रवास वारंवार तर होतातच, पण अनेक जण लांबचा प्रवास करून पुन्हा आपल्या मूळ पक्षात येतात आणि या मूळ पक्षाचे नेतेदेखील 'सुबह का भूला श्याम को वापस आये तो उसे भूला नही कहते' अशा थाटात त्याचे स्वागत करतात. अर्थात, जिथे विरोधी पक्षनेताच पक्षांतर करतो तिथे इतरांना दोष देण्यात काय अर्थ आहे?

थोडक्यात, विचारसरणी, पक्षनिष्ठा, नेत्यावरची निष्ठा आदी बाबी या बहुतांश वेळा दाखवण्यासाठी असतात. आपल्या कृत्याला, मग ते कितीही स्वार्थाने प्रेरित असले तरीही, काहीतरी एक तात्विक मुलामा असावा ही भारतीयांची जुनी गरज आहे. या सर्व बाबी यासाठी उपयोगी ठरतात. खरे कारण आर्थिक हितसंबंधांचे रक्षण हेच असते. हीच परिस्थिती राजकीय नेते-कार्यकर्ते आणि सर्वसामान्य मतदार यांच्याबाबतीत झालेली आहे. मतदारांना पैसे वाटण्याची पद्धत ही काही आजची किंवा १९९० नंतरच्या कालखंडाची देणगी आहे असे नाही. मात्र, स्पर्धा तीव्र नव्हती तेव्हा तसे करण्याची गरज भासत नसे किंवा तसे करण्याची क्षमता केवळ सत्ताधारी पक्षाकडे होती. आता परिस्थिती बदललेली आहे. प्रत्येकाची आर्थिक ताकद वाढलेली आहे. त्यामुळे, सगळ्यांच उमेदवारांकडून असे व्यवहार होत असावेत. शिवाय, मतदारांची वृत्तीदेखील बदललेली आहे. कोणाला नाही म्हणावे तर ते डोळ्यावर येते. निवडून आल्यावर विकासाचा अनेकदा पत्ताच नसतो. त्यामुळे, निदान निवडणुकीच्या हंगामात कमाई



करून घ्यावी, अशी भावना वाढत चालली आहे. आपल्याला काही मिळाले तरच मतदान करावे अशी आर्थिकदृष्ट्या अक्षम घटकांचीच अपेक्षा काय ती असते, असे मुळीच नाही. तर, स्वतःला सुशिक्षित आणि सजग म्हणवणा-यांकडून, कधी सूचक तर कधी थेट मागणी होते. एकूणच समाजमनात निवडणूका आणि इतर दैनंदिन आर्थिक व्यवहार यांच्यात काहीही फरक राहिलेला नाही. या सगळ्याच्या मुळाशी, मूलतः लोकशाही ही खर्चिक राजकीय व्यवस्था होय हे भान आपल्याला कधीच आलेले नाही, ही बाब आहे. निवडणुकांमध्ये होणारा खर्च जरी सोडला तरी पक्षांच्या दैनंदिन कामकाजासाठी पैसा लागतोच. तो कोठून आणायचा किंवा कसा उभा करायचा यावर पक्षांनी आपापल्या परीने उपाय शोधले आहेत. मात्र, लोकशाही व्यवस्थेचा अविभाज्य घटक म्हणून या पैलूकडे पाहिले गेले नाही किंवा त्याची चर्चा झाली नाही.

गेल्या सहा दशकांत राजकारणातील व्यक्तींच्या आर्थिक व्यवहारांचे स्वरूपदेखील बदलले आहे. पूर्वी शहरी भागातील नेते हे वकील, डॉक्टर किंवा व्यापारी या पेशांतील असत किंवा सधन संयुक्त कुटुंबातील असत. इतरांच्या तुलनेत डाव्या पक्षांमध्ये पूर्णवेळ कार्यकर्ते अधिक असत. यातील बहुतांश पुरुष होते. त्यांच्या सहधर्मचारिणी नोकरी करायच्या किंवा घर सांभाळायच्या. शिवाय, सहानुभूतीदारांचेही योगदान असायचे. कामगार संघटना हाती असतील तर त्यांचे पदाधिकारी म्हणून काही एक मानधन मिळायचे. साधी राहणी होती त्यामुळे खर्चही कमी असायचा. ग्रामीण नेतृत्वाकडे शेती होती. सहानुभूतीदारही असायचे. ग्रामीण भागात सहकार चळवळ विस्तारली तसा उपजिविकेचा मुद्दा काही अंशी सुटला. आता चित्र बरेच पालटले आहे. राजकारणातील बहुतांशांचा पेशा 'समाजसेवा' हा असतो. एवढ्या मोठ्या संख्येची उपजीविका समाजसेवेतून कशी काय चालू शकते, हा प्रश्न कोणालाच पडत नाही. कोणतेही उत्पन्नाचे मोठे साधन नसताना अनेकांना खर्चिक जीवनशैली कशी काय परवडू शकते, हा प्रश्न पडतो आणि त्याचे उत्तरदेखील आपल्याला माहित असते.

राजकारणात टिकून राहायचे तर आर्थिक ताकद हवीच. पण ती आणायची कोठून? तर, मुख्य मार्ग म्हणजे, आपल्या परिसरांतील आर्थिक

व्यवहारांवर पकड असणे हा! राज्यसंस्थेकडे खर्च करायला पैसा होता तोपर्यंत ‘शासकीय खर्च’ हा या मार्गाच्या केंद्रस्थानी होता. विविध कंत्राटे कोणाला कोणाच्या सांगण्यावरून दिली गेली, कोणाच्या भागातील कंत्राटाबाबत कोणाचा शब्द अंतिम असतो. कोण किती टक्केवारी घेतो आदी बाबींची चर्चा होत असे. राज्यसंस्थेव्यतिरिक्त आर्थिक व्यवहारांकडे राजकीय क्षेत्राकडून फारसे लक्ष दिले जात नसे. बेकायदेशीर व्यवसायांना असलेल्या राजकीय वरदहस्ताचे प्रमाणदेखील कमी होते. राज्यसंस्थेची क्षमता जशी कमी होत गेली तसतसा तिच्याकडून होणारा आर्थिक पुरवठा कमी झाला आणि लक्ष इतर व्यवहारांकडे वळले.

त्यामुळे आता विविध ठिकाणच्या नेत्यांची प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संमती असल्याशिवाय त्यांच्या प्रभावाच्या परिसरातील मोठे आर्थिक व्यवहार होत नाहीत. अनेकदा तर या व्यवहारांत स्थानिक प्रभावी नेत्यांचाच सहभाग असतो, असे बोलले जाते. कोणत्या व्यावसायिकांच्या मागे कोणती ‘बडी हस्ती’ आहे याची चर्चा होत असते. या शिवाय, स्थानिक उद्योगजगताकडून विविध रूपाने कमी-अधिक सक्तीने होणारी वसुली वेगळीच. बेकायदेशीर व्यवहारांचा परीघ विस्तारतो आणि त्याचा संबंध निवडणुकीच्या राजकारणाशी असतो. एकूण राजकीय नेतृत्वाचे लक्ष स्थानिक अर्थव्यवस्था कशी विस्तारावी यापेक्षा, आहे त्यातून आपल्याला अधिकाधिक वाटा कसा मिळेल, याकडे असते. त्यामुळे, अर्थकारणाचा परीघ आकुंचन पावत जातो. या सगळ्याचा विपरित परिणाम सर्वत्र होतोच पण आधीच मागास असलेल्या भागावर त्याचे आघात तुलनेने अधिक होतात.

एकूणच धार्मिक सणांचे आणि उत्सवांचे जे झाले आहे तेच निवडणुकांचे आणि राजकारणाचे झाले आहे. सण-उत्सवांमधील धर्मभावना आणि श्रद्धा ही परिघस्थ होऊन आर्थिक व्यवहार केंद्रस्थानी आले आहेत; तसेच निवडणुका-राजकारणातील विचारसरणी, पर्यायी धोरणांची चर्चा, भौतिक विकासाचा आग्रह आदी बाबी बाजूला पडून अर्थकारणाभोवती सर्व लक्ष केंद्रित झाले आहे. वयाच्या साठीत प्रवेशलेल्या महाराष्ट्राची राजकीय कमाई म्हणायची तर हीच! ■■



## भेट अंक योजना

‘अर्थबोधपत्रिका’ या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. ‘अर्थबोधपत्रिका’ आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक ‘भेट अंक’ पाठवू. अंक आवडल्यास त्यांना ‘पत्रिके’चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

## ‘अर्थबोधपत्रिके’च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. ‘अर्थबोधपत्रिके’च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक : वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८०० /- रुपये** |

# वाचनातील नवे काही..

## Ideology and Identity : The Changing Pary System of India

**By - Pradip Chibbar. Rahul Varma**
**Oxford University Press, 2018, New Delhi.**
**pp.320**

भारतातील राजकीय पक्ष, त्यांची स्वतंत्र विचारधारा आणि त्यांनी विविध बाबींतून जपलेली स्वतःची ओळख हे भारतीय लोकशाहीतील एक अंगभूत असे वैशिष्ट्य मानावयास हवे. पाश्चात्य जगातील काही पद्धतींचे अनुकरण निवडणूक प्रक्रियेत केलेले असले तरीही येथील राजकीय पक्ष व्यवस्था ही पाश्चात्य जगाहून पूर्णतः भिन्न असल्याचे दिसते. भारतातील राष्ट्रीय तसेच प्रादेशिक पक्षांनी जपलेली विचारधारा, त्यांचे समाजव्यवस्थेशी असणारे नाते, पक्षापक्षांतील राजकीय मतभेद, विविध प्रकारच्या विचारधारा या सगळ्यांचा एकत्रितपणाने वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत ग्रंथामध्ये अभ्यासपूर्ण पद्धतीने केल्याचे दिसून येते. भारतातील पक्षापक्षांमध्ये जी वैचारिक विभागणी झालेली आहे तिचा वेध घेण्यासाठी देशभराच्या विविध भागांतील मतदारांचे केलेले सर्वेक्षण या लेखनासाठी आधारभूत ठरलेले आहे. १९६० नंतर देशातील राजकीय विचारधारांमध्ये येत गेलेले स्थित्यंतर, मतदारांशी तुटत गेलेले विश्वासाचे नाते या सगळ्यांचा उहापोह या ग्रंथात नेमकेपणाने करण्यात आलेला आहे. २०१४ सालानंतर देशातील राजकीय व्यवस्थेत आणि पक्षांच्या विचारधारेत दिसून येणारे वैचारिक परिवर्तन, राजकीय पक्षाचे नेतृत्व करणा-यांचे समाजातील बदलत असलेले स्थान आणि त्यांना निवडून येण्यासाठी आवश्यक असणारा जनाधार मिळवण्यासाठी केले जात असलेले प्रयत्न यांचाही वेध या अनुषंगाने घेण्यात आलेला आहे. राज्यशास्त्राचा अभ्यास करणारे विद्यार्थी, प्राध्यापक, राजकीय विचारवंत या सगळ्यांसाठीच यातील आकडेवारी, सर्वेक्षणाचे तपशील निश्चितच महत्त्वाचे ठरतील. भारतातील राजकीय पक्षांची विचारधारा आणि त्यात होत गेलेली स्थित्यंतरे समजून घेण्याच्या दृष्टिकोनातून हा ग्रंथ निश्चितपणे उपयोगी ठरावा असा आहे. ■■



**RNI Regn.No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्याससशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**